आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

३० जानेवारी २०२५ - गुरुवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- राष्ट्रपिता महात्मा गांधी तसंच देशासाठी बलिदान करणाऱ्या हुतात्म्यांना आज देशाची आदरांजली

- अर्थसंकल्पीय अधिवेशनात कामकाज सुरळीतपणे चालवण्याच्या दृष्टीने सहकार्य करण्याचं सरकारचं आवाहन

- वक्फ सुधारणा विधेयकासंदर्भात नेमलेल्या संयुक्त संसदीय समितीचा अहवाल लोकसभा सभापतींना सादर

- ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये पदकतालिकेत कर्नाटक अग्रस्थानी, तर १२ पदकांसह महाराष्ट्र तिसऱ्या स्थानावर

- **आणि**

- थायलंड मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या किदम्बी श्रीकांतची उपांत्यपूर्व फेरीत धडक

**<><><><><>**

राष्ट्रपिता महात्मा गांधी तसंच देशासाठी बलिदान करणाऱ्या हुतात्म्यांना आज देश आदरांजली वाहत आहे. हुतात्मा दिन म्हणून आजचा दिवस पाळण्यात येतो. नवी दिल्लीत राजघाट या गांधीजींच्या समाधीस्थळी सकाळी सर्वधर्म प्रार्थनेचं आयोजन केलं होतं.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी गांधीजींच्या समाधीवर पुष्पचक्र वाहून अभिवादन केलं. उपराष्ट्रपती जगदीप धनखड, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, लोकसभेचे सभापती ओम बिर्ला, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, विरोधी पक्षनेते राहूल गांधी यांनीही समाधीस्थळावर पुष्पांजली अर्पण करुन अभिवादन केलं.  तिन्ही सैन्यदलांचे प्रमुख तसंच संरक्षणदल प्रमुखही यावेळी उपस्थित होते.

‘महात्मा गांधींचे आदर्श देशवासियांना विकसित भारताची उभारणी करण्यासाठी प्रेरणा देतील’, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. देशासाठी बलिदान  केलेल्या हुतात्म्यांना त्यांनी अभिवादन केलं आहे.

सत्य, अहिंसा, सर्वोदय आणि सर्वधर्मसमभाव याबद्द्ल महात्मा गांधींचे विचार आजही आपल्याला मार्गदर्शक आहेत, अशा शब्दात  काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी महात्मा गांधी यांना श्रद्धांजली वाहिली आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्राचे राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी महात्मा गांधी यांच्या सत्त्याहत्तराव्या बलिदान दिनानिमित्त आज मुंबईतल्या मणीभवन इथं भेट दिली. महात्मा गांधींच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन त्यांनी प्रार्थनासभेत भाग घेतला. या वेळी बोलताना राज्यपालांनी सर्वांना जात, पंथ आणि धर्म यांच्या संकीर्ण मतभेदापलीकडे जाण्याचे आवाहन केलं. विद्यार्थ्यांनी महात्मा गांधींच्या सत्य, अहिंसा आणि सदाचाराच्या विचारांचं पालन करावे, असं आवाहन त्यांनी यावेळी  केलं.

आकाशवाणी मुंबईच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनीही आज हुतात्मा दिनानिमित्त महात्मा गांधी तसंंच देशासाठी बलिदान केलेल्या हुतात्म्यांना आदरांजली वाहिली.

महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथी निमित्त हिंगोली इथं आज स्पर्श कुष्ठरोग जनजागृती अभियानाअंतर्गत विद्यार्थ्यांची रॅली काढण्यात आली.

**<><><><><>**

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर केंद्रसरकारने आज सर्वपक्षीय बैठक बोलावली होती. संरक्षण मंत्री राजनाथ सिंग, केंद्रीय आरोग्यमंत्री जे. पी. नड्डा, संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू, तसंच काँग्रेसचे ज्येष्ठ नेते जयराम रमेश, गौरव गोगोई, तृणमूलचे सुदीप बंदोपाध्याय, समाजवादी पार्टीचे रामगोपाल यादव, बिजू जनता दलाचे सस्मित पात्रा आणि द्रमुकचे टी आर बालू यांच्यासह विविध पक्षांचे खासदार त्यात सहभागी झाले होते. बैठकीला ३६ विविध पक्षांचे मिळून ५२ खासदार उपस्थित होते असं संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी बैठकीनंतर बातमीदारांना सांगितलं. अर्थसंकल्पीय अधिवेशनात कामकाज सुरळीतपणे चालवण्याच्या दृष्टीने सहकार्याचं आवाहन यावेळी सरकारतर्फे करण्यात आलं.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या अभिभाषणानं उद्या अधिवेशनाची सुरुवात होईल. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन येत्या शनिवारी अर्थसंकल्प सादर

करणार आहेत. सोमवारी राष्ट्रपतींच्या अभिभाषणाबद्दलच्या आभार प्रस्तावावर दोन्ही सभागृहात चर्चा होईल.

<><><><>

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन शनिवारी लोकसभेत अर्थसंकल्प सादर करतील. या अर्थसंकल्पातून कुठल्या घटकासाठी काय काय तरतूद केली जाईल, याबद्दल नागरिकांमधे चर्चा सुरू आहे. तसंच अर्थसंकल्पाकडून अपेक्षा व्यक्त केल्या जात आहेत. छत्रपती संभाजीनगर इथल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा अर्थशास्त्रातला संशोधक विद्यार्थी रोहिदास जाधव अर्थसंकल्पाकडून अपेक्षा व्यक्त करताना म्हणाला……

<><><><>

वक्फ सुधारणा विधेयकासंदर्भात नेमलेल्या संयुक्त संसदीय समितीने आज आपला अहवाल लोकसभा सभापती ओम बिरला यांना सादर केला. ३१ सदस्यीय समितीचे अध्यक्ष जगदंबिका पाल यांनी सांगितलं, की गेले ६ महिने या विषयाशी संबंधितांशी, विधिज्ञ आणि तज्ज्ञांशी समितीने चर्चा करुन समितीने हा ६५५ पानी अहवाल तयार केला आहे. या विधेयकासंबंधी सुचवलेल्या १४ सुधारणा समितीने स्वीकारल्या आहेत. नोंदणीचं डिजीटायझेशन, लेखापरीक्षण, बेकायदेशीरपणे कब्जा केलेल्या वक्फ मालमत्ता परत मिळवण्यासाठी कायदेशीर यंत्रणेत महत्त्वपूर्ण सुधारणा अशा बाबींचा विधेयकांत समावेश आहे.

**<><><><><>**

उत्तरप्रदेशात प्रयागराज इथं महाकुंभ नगरीत गर्दीच्या नियोजनासाठी राज्यसरकारनं वाहनांना प्रवेशबंदीचा कालावधी येत्या ४ फेब्रुवारीपर्यंत वाढवला आहे. दरम्यान संगमस्थळावर काल झालेल्या चेंगराचेंगरीतल्या मृतांची संख्या आता ३० झाली आहे आणि ६० जण जखमी झाल्याचं वृत्त आहे. जखमींना मेला रुग्णालयांत दाखल करण्यात आलं आहे. सुरक्षा यंत्रणेचा आढावा घेण्यासाठी उत्तरप्रदेशचे मुख्य सचिव आणि पोलीस महासंचालकांनी आज प्रयागराजचा दौरा केला. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी या दुर्घटनेच्या न्यायालयीन चौकशी करण्याचे आदेश दिले असून त्याकरता तीन सदस्यीय आयोगाची स्थापना करण्यात आली आहे.

**<><><><><>**

उत्तराखंडमधे सुरू असलेल्या ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये कर्नाटक पदकतालिकेत आघाडीवर असून मणिपूर दुसऱ्या स्थानावर आहे. महाराष्ट्र १२ पदकांसह तिसऱ्या स्थानावर आहे. महाराष्ट्राच्या पदकांमध्ये ३ सुवर्ण, ६ रौप्य आणि ३ कांस्यपदकांचा समावेश आहे. कर्नाटकाने ६ सुवर्ण, २ रौप्य तर १ कांस्य पदक पटकावलं आहे. मणिपूरच्या खात्यात ४ सुवर्ण आणि ४ रौप्य पदकांचा समावेश आहे.

**<><><><><>**

बँकॉक इथं सुरू असलेल्या थायलंड मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या किदम्बी श्रीकांतने पुरुष एकेरीत उपांत्यपूर्व फेरीत धडक मारली आहे.

श्रीकांतने हाँगकाँगच्या जेसन गनवान याचा २१-१९, २१-१५ असा पराभव केला. काल रात्री श्रीकांतने इस्त्रायलच्या दनिल दुबोवेन्को याचा २१-१३, २१-१८ असा पराभव केला. श्रीकांतने मध्यंतरापर्यंत ११-४ अशी आघाडी घेत पहिला गेम जिंकला. दुसऱ्या गेममधे श्रीकांतने १०-५ अशी आघाडी घेतली. मात्र दुबोवेन्कोने चांगली झुंज देत १५-१५ अशी बरोबरी साधली. त्यानंतर श्रीकांतने शानदार प्रदर्शन करत सामना जिंकला.

<><><><><>

रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेत आज मुंबईत सुरु झालेल्या सामन्यात मुंबईनं मेघालयाचा पहिला डाव ८६ धावात गुंडाळला. मुंबईतर्फे शार्दुल ठाकुरनं ४, मोहित अवस्थी ३, सिल्वेस्टर डिसुझानं २, तर शम्स मुलाणीनं १ गडी बाद केला.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा मुंबईच्या २  बाद ८७ धावा झाल्या होत्या.

<><><><><>

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेत परराज्यातल्या लाभार्थ्यांनी बोगस लॉगिन आयडी तयार करून तब्बल ११७१ अर्ज दाखल केले असल्याचं समोर आलं आहे. हे भामटे उत्तर प्रदेश, आसाम, पश्चिम बंगाल आणि राजस्थान मधले असल्याचं पोलीस, महसूल आणि महिला बाल विकास विभागाने केलेल्या तपासात आढळलं आहे. संबंधित अर्जदारांचा लाभ थांबवण्यात आला आहे. यातले २२ अर्ज सोलापूर जिल्ह्यातल्या बार्शी तालुक्यातून खोट्या कागदपत्रांच्या आधारे भरल्याचं आढळलं असून त्याबाबत बार्शी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**<><><><><>**

ठाणे जिल्ह्यात बेकायदेशीर वास्तव्य करणाऱ्या चार बांगलादेशी महिलांना पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार मानवी तस्करीविरोधी दलाने मिळालेल्या माहितीवरुन ठाणे जिल्ह्यात मनोरपाडा भागातल्या एका पुनर्वासितांच्या चाळीवर मंगळवारी धाड टाकली. या ठिकाणी राहणाऱ्या चार बांगलादेशी महिलांना भारतातल्या वास्तव्याची अधिकृत कागदपत्रं दाखवता आली नाहीत तेव्हा पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतलं.

**<><><><><>**

नवी दिल्लीत मराठी साहित्य संमेलन होणं ही मराठी माणसासाठी अभिमानाची गोष्ट असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. ९८व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या नवी दिल्ली इथल्या कार्यालयाचं उद्घाटन फडणवीस यांच्या हस्ते आज झालं, त्यावेळी ते बोलत होते. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर प्रथमच देशाच्या राजधानीत हे भव्य संमेलन होत असून ते यशस्वी व्हावं, अशा शुभेच्छाही फडणवीस यांनी दिल्या.

**//<><><><><>//**